# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## गुंठेवारी विभाग

फोन : २३३३५३६-४०, २३४८००१-०५, P.B.X. २३३१२८१, २३३१२८३ Fax : (०२४० ) - २३३१२१३

जा.क्र./मनपा/गुंठे /-१/१९७/२०२४ दिनांक २७/०२/२०२४

# जाहीर प्रगटन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत वसाहतीमधील मिळकतधारकांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ (सुधारणा) २०२१ दिनांक १२/०३/२०२१ रोजीच्या राजपत्रान्वये अंमलात आला. सदर अधिनियमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाने प्रस्ताव क्रमांक १८१ / २०२१, दिनांक ०६/०८/२०२१ ने गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी विकास शुल्काचे दर निश्चित केले. नजीकच्या काळात विकास शुल्कात ५०% सुट देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी व नागरीकांकडुन सातत्याने होत असल्याने, विकास शुल्कात सवलत देण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधिन होती. विकास शुल्कात ५०% सुट देण्याची मागणी तसेच मिळकतधारकांची आर्थिक स्थिती लक्षात घेता नागरीकांना गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करणे सोयीचे व्हावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाने केवळ २० x ३० = ६०० चौ. फुट ( 55.76 Sq.M. ) पर्यंतच्या भूखंडासाठी प्रचलित शुल्क आकारणीत विकास खर्चात ( Betterment Charges ) या आर्थिक वर्षात दिनांक ३१/०३/२०२४ रोजी पर्यंत व पुढील आर्थिक वर्षात दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पर्यंत ५०% सवलत देण्याचा धोरणात्मक निर्णय ठराव क्रमांक १२८०/२०२४ दिनांक २३/०२/२०२४ ने घेतला आहे. अनधिकृत वसाहतीमधील मिळकतधारकांनी या संधीचा लाभ घ्यावा व आपले भूखंड / भूखंडासहीत बांधकाम दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पर्यंत गुंठेवारी अधिनियमातंर्गत नियमाधिन करुन घ्यावेत, असे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत आहे. दिनांक ३०/०६/२०२४ नंतर सादर होणाऱ्या प्रस्तावास विकास खर्चात ५०% सवलत देण्यात येणार नाही. तसेच जे मिळकतधारक नियमितीकरणासाठी आपले प्रस्ताव सादर करणार नाहीत, अशा मिळकतधारकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६० अन्वये अनधिकृत बांधकाम निष्काशित करण्याची कारवाई करण्यात येईल.

स्वाक्षरित/-

**अतिरिक्त आयुक्त - १**

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**